# रयतेचे राजे
## छत्रपती शिवाजी महाराज



संविधान जागर अभियान

**प्रकाशक:**

## संविधान जागर अभियान

(मा. न्या. बी.जी. कोळसे पाटील, प्रा. डॉ. सुखदेव थोरात, तुषार गांधी, उत्तम कांबळे, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन)

**संपर्क पत्ता:**

15, गार्डन लेआऊट, बेझॉनबाग, नागपूर, महाराष्ट्र – 440 014

**मुद्रक:**

आर.एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 411 030

- स्वप्निल फुसे: 79723 45764
- नागार्जुन वाडेकर: 98602 39899
- राजाभाऊ करवाडे: 98222 02739

सामाजिक विषयांवर माहिती मिळवण्यासाठी व्हॉट्सअप क्यूआर कोडला स्कॅन करा!

**सहयोग मूल्य ₹15/-**

## संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई अशा अनेक संतांनी

## महाराष्ट्राच्या मातीत स्वातंत्र्य, मानवता आणि बंधुतेच्या मूल्यांची पेरणी केली.




विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ॥

सकळांसी येथे आहे अधिकार ।
कलियुगी उद्धार हरिच्या नामे
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळाही अधिकार ।
बाळे नारी नर आदिकरोनी वेश्याही ॥

## छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांच्या विचारांवर आधारित लोककल्याणकारी स्वराज्य स्थापन केले.


# रयतेचे स्वराज्य



शिवरायांच्या स्वराज्यात प्रजेच्या अन्न, वस्त्र आणि
निवारा या जीवनावश्यक गरजा सन्मानाने पूर्ण होत;
स्त्रियांना आत्मसन्मानाने जगता येई;
जातीभेद आणि धर्मभेद यांना थारा नसे;
कोणावरही अन्याय वा जुलूम होत नसे;
शेती आणि व्यापार उदीमाची भरभराट होत असे;
प्रजा सुखासमाधानाने नांदत असे.

# “आधी लगीन कोंढाण्याचं, मग माझ्या रायबाचं ...”

– तानाजी मालुसरे



पन्हाळगडाच्या वेढ्यावेळी महाराजांसारखा वेश करून शिवरायांसाठी बलिदान देणारे शिवा न्हावी

घोडखिंडीत बलिदान देणारे बाजीप्रभू देशपांडे व शेकडो बांदल

- मुरारबाजी
- नेताजी पालकर
- जीवाजी महाला
- हिरोजी फर्जंद
- मदारी मेहतर
- सिद्दी हिलाल

**यांसारखे अनेक जण स्वराज्यासाठी बलिदान द्यायला तयार होते.**

# जुलमी वतनदारांना घातली वेसण

**काही वतनदार रयतेकडून जबरदस्तीने भरमसाठ कर वसूल करून रयतेला छळायचे.**
**सारा समाज या अत्याचाराने त्रस्त होता.**



## शिवरायांनी वतदारांना लावला चाप

**वतनदारी नष्ट करून मुलखी-लष्करी सैनिक व अधिकाऱ्यांना**

## वेतन सुरू करणारे पहिले राजे

**शिवरायांची वतनदारांना ताकीदः**

**“वतनदारांनो, वाडे पाडा,**
**रयतेसारखे साध्या घरात रहा”**

# शेतकऱ्यांचे राजे

शिवरायांनी जमीन मोजण्याची पद्धत सुरू केली.
शेतीच्या उत्पन्नावर आधारित शेतसारा ठरवला.



## अधिकाऱ्यांना ताकीद

"ठरलेल्या महसूलापेक्षा जास्त वसूल करू नये"

शेतकऱ्यांना अन्नधान्य, बी-बियाणे, औतकाठी दिली.

दुष्काळात आधार दिला आणि बैल घ्यायला रोख पैसे दिले.

# शेतकऱ्यांची काळजी

दुष्काळात शेतसारा माफ केला,
बिनव्याजी कर्ज दिले,
हप्तेवसुलीत सवलत दिली.



शिवरायांनी पडीक जमिनी रयतेला दिल्या.
लागवडीसाठी सर्व मदत केली.
शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले अन्
सर्वांच्या घरात सुख आले.

# रयतेच्या पिकांची काळजी

**पूर्वी मोहिमेच्या काळात सैन्य उभ्या पिकातून जायचे. पिकांची प्रचंड नासाडी करायचे.**

## सैन्याला दिलेल्या आज्ञा

**“सैन्याच्या तुकडीने मोहिम काढताना उभ्या पिकातून जाता कामा नये”**





## “रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये”

### “सैन्यातील घोड्यांना दाणा-वैरण लागली तर रोख रक्कम देऊन घ्यावी”

**“खबरदार, रयतेला त्रास द्याल तर...”**

# सैन्य: इतर राजांचे व शिवरायांचे

इतर राजांचे सैन्य सरंजामी पद्धतीचे होते. ते खडे सैन्य होते, लढाया करणे त्यांचा व्यवसाय होता, युद्धांतून मिळालेली लूट त्यांच्या उपजीविकेचे साधन होते.

घरादारापासून व शेतीच्या कामापासून दूर असल्यामुळे त्यांना रयतेची पर्वा नसे.



शिवरायांच्या सैन्याचा हेतू लूट करणे नव्हता, तर लूट थांबविणे हा होता.

त्यांना निश्चित पगार देण्यात येई.

# शेतकऱ्यांचे सैन्य



शिवरायांचे सैन्य निव्वळ सैनिक नव्हते, ते शेतकरीही होते.

बहुतेक शिपाई शेती-भाती करीत, बायका-मुलांबरोबर रहात.

म्हणूनच ते महिलांचा आदर करत, रयतेच्या व्यथा समजत.

सैन्यातील कर्त्या शेतकऱ्याला शेतीसाठी विशेष रजा देणारे शिवराय हे एकमेवाद्वितीय राजे



# रयतेप्रती संवेदनशीलता



आरमारात जहाज उभारणीसाठी लाकडाचे महत्त्व असूनही शिवरायांची आज्ञा:

**“रयतेने लेकरांसारखी जतन करून ठेवलेली झाडे तोडल्यास त्यांचे दु:खास पारावार काय? जरी झाड जीर्ण झाले असले तरी त्याचे धन्यास राजी करून, पैसे देऊन तोडून घ्यावे.”**



“कोणी शेकोटी करतील, आग लागून सारे पीक जळून खाक होईल. ते गोष्टी न हो.”

# हिंदवी स्वराज्य

## हिंदवी स्वराज्य म्हणजे सर्व जाती–धर्मांच्या लोकांचे राज्य



**हेरखात्याचा प्रमुख**
रामोशी
बहिर्जी नाईक

**आरमाराचे सैनिक**
कोळी, सोनकोळी

**विश्वासू सेवक**
मुसलमान
सिद्दी हिलाल

**अष्टप्रधान मंडळ**
ब्राम्हण

**आरमाराचे सुभेदार**
भंडारी
मायनाक

**किल्लेदार**
अस्पृश्य व महार

**गोमाजी नाईक यांचा सल्ला महाराजांनी आयुष्यभर अवलंबला:**

**“ज्यास राज्य करणे त्याने अठरा जाती, चारी वर्ण यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावे.”**

# सर्वसमावेशक सैन्य

## सैन्यात भरती होण्यासाठी धर्म ही अट नव्हती. तर स्वराज्यनिष्ठा आवश्यक होती.

**शिवरायांचा धर्मनिरपेक्षतेचा विचार पटल्याने विजापूरच्या लष्करातील 700 पठाण महाराजांच्याकडे सेवेसाठी आले.**



**दर्यासारंग दौलतखान**
आरमार प्रमुख

**नूरखान बेग**
पहिला सरनोबत

**सिद्दी इब्राहिम**
अंगरक्षक

**इब्राहिम खान**
तोफखाना प्रमुख

**काजी हैदर**
वकील

**सिद्दी वाहवाह**
घोडदळ सरदार

# सर्व धर्मांचा आदर

## सर्व धर्मांच्या पवित्र स्थळांचा सन्मान केला



हिंदू मंदिरे आणि मुस्लिम संतांचे दर्गे व मशिदींना देणग्या दिल्या.

केळशीचे हजरत बाबा याकुत यांना दर्गा बांधण्यासाठी अनुदान दिले. शिवाय वर्षासन देऊन तेथील खर्चाची सोय केली.



# सैनिकांना सक्त ताकीद

**“लुटीला गेल्यावर कुराण ग्रंथाला, मशिदीला नुकसान पोहोचवू नये, कोणत्याही स्त्रीला छळू नये. जर एखादी कुराणाची प्रत हाती आली तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून आपल्या मुसलमान नोकरांच्या स्वाधीन करावी, असा आदेश शिवरायांनी दिला होता.”**

**– खाफीखान (औरंगजेबाच्या दरबारातील इतिहासकार)**



**“ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा, यात कोणी बखेडा करू नये.”**

**– रघुनाथ पंडितांनी केलेला शिवरायांच्या आज्ञेचा उल्लेख**

# जिझिया कराबाबत शिवरायांनी औरंगजेबास लिहिलेल्या पत्राचा अंश

"असमानी किताब म्हणजे कुराण. ते ईश्वराची वाणी आहे. त्यात ईश्वरास 'जगाचा ईश्वर' म्हटले आहे, 'मुसलमानांचा ईश्वर' असे म्हटलेले नाही. कारण हिंदू आणि मुसलमान दोन्ही ईश्वरापाशी एकरंग आहेत. कुणी मसजीदीमध्ये त्याचे स्मरण करून बांग देतात, तर कुणी देवालयात घंटा वाजवितात. कोणाच्याही धर्मास विरोध करणे हे आपला धर्म न पाळणे व ईश्वराने लिहिलेले रद्द करणे वा त्यालाच दोष देणे आहे. शास्त्र व न्याय या दोन्हीही दृष्टीने विचार केला तरी जिझिया पट्टी ही गैर आहे."

# अफजलखानाला का मारले?

## तो स्वराज्याचा शत्रू होता म्हणून!

## हे हिंदू–मुस्लिम युद्ध नव्हते

अफजलखानाचा वकील
कृष्णाजी भास्कर कुलकर्णी

शिवरायांचा अंगरक्षक
सिद्दी इब्राहिम खान



## मृत्यूनंतर वैर संपले

शिवरायांनी प्रतापगडावर अफजलखानाची कबर बांधली आणि त्याच्या दिवाबत्तीची सोय स्वराज्याच्या खर्चातून लावून दिली

# आया–बहिणींची काळजी



शेतकऱ्याच्या पोरीवर बलात्कार करणाऱ्या बाबाजी भिकाजी गुजर या रांझाच्या पाटलाचे हात-पाय तोडायची शिक्षा दिली.

**लुटीत आलेल्या कल्याणच्या मुसलमान सुभेदाराच्या सुनेला महाराजांच्या समोर हजर केले गेले**

## शिवरायांनी तिला चोळी-बांगडी देऊन सन्मानाने परत पाठवले.



बेलवडी येथे सरदार सकुजी गायकवाड याने २७ दिवस लढलेल्या किल्लेदार सावित्रीबाई या शत्रू स्त्रीवर बलात्कार केला

# शिवरायांनी आपल्याच सरदाराचे डोळे काढून त्याला तुरुंगात डांबले



## सावित्रीच्या शौर्याचा सन्मान करून जिंकलेला प्रदेश तिला परत केला



महाराजांचा सन्मान करत सावित्रीने शिल्प तयार केले

# सैन्याला दिलेल्या आज्ञा

“मोहिमेस जाताना कुणीही बटकिणी-कुणबीणी अगर कलावंतिणीस बरोबर घेऊ नये”



“कुणाही शत्रू स्त्रीस बटकीण बनविता कामा नये”



“मोहिमेवर असताना स्त्रिया आणि लहान मुले यांना त्रास देऊ नये”

**“बलात्कार कदापीही न करावा”**

# मनुस्मृतीचे कायदे मोडले



## शस्त्रबंदीचा कायदा मोडला

सर्व शूद्र, अस्पृश्य आणि महिलांच्या हाती शस्त्र दिले.



**कुणबी, बलुतेदार आणि अस्पृश्य जातींना जमिनीचे पट्टे दिले**

**महिलांना सन्मान देण्याचे आदेश दिले.**

**समुद्रबंदी झुगारून**

**दूरदृष्टीचे प्रतीक असलेले आरमार उभारले**



# अंधश्रद्धाविरोधी शिवराय

**मूल पालथे जन्मणे अशुभ समजले जायचे.**
**छ. राजाराम महाराज पालथे जन्मल्यावर**
**शिवराय म्हणाले,**

**“पुत्र पालथा जन्मला, तो दिल्लीची पातशाही पालथी घालील.”**

**शिवरायांच्या बहुतेक मोहिमा**
**अमावस्येला**

## शिवरायांच्या आज्ञापत्रातून:

**“वेषधारी, फकीर, जोगी, जंगमादि जे भुताटकी करून फिरणारे आहेत त्यांचा विश्वास करू नये, त्यांच्या मोहात पडू नये.”**

# शिवरायांची भवानी तलवार



1659 साली कोकणातील खेम सावंत यांनी महाराजांना पोर्तुगीज बनावटीची तलवार पेश केली. त्यावर पोर्तुगीज भाषेत लिहिलेले आहे. हीच ती भवानी तलवार.

# गुलामांच्या व्यापारास बंदी

गुलामी प्रथेने गरीब रयतेचे शोषण होत होते.

## शिवरायांची ताकीद:



**“माझ्या राज्यात स्त्रियांची किंवा पुरुषांची गुलाम म्हणून खरेदी व विक्री करण्यास संमती नाही.”**

# स्थानिक व्यापारवृद्धी

## समुद्री व्यापाराचे महत्त्व समजून बंदरे आणि जलदुर्ग बांधले व त्यांच्या संरक्षणासाठी आरमार उभे केले

## बाहेरील प्रदेशातील वस्तूंवर जास्त कर लादले



पोर्तुगीज मिठावर जबरी कर

स्वराज्यातील मिठावर शून्य कर



## जाती आधारित कराची असमानता नाकारली




## स्थानिक लघुउद्योग व कारागिरांना प्रोत्साहन

# समाजवादी शिवछत्रपती पोवाडा

आजही हवा मज असाच शिवबा माझा ।
तो समाजवादी महाराष्ट्राचा राजा ।
तो राजा कसला लोकशाहीचा कलिजा ।
तो असुनि राजा पर समाजवादी सरजा ।
मुजरा माझा त्या महान संस्कृतिबुरुजा ।
भागवीत होता आधी जनतेच्या गरजा ।
नफ्यासाठी धडपडे त्यास म्हणे तू मर जा ।
ठावं न्हवता विसावा फक्त ठावं होती प्रजा ।

सारी हयात घोड्यावर गेली ।
काया झिजवली ।
प्रजा सुखी केली ।
कीर्ती पसरली ।
अशी फुलवेली ।
पुनः उगवली नाही बघा राजे ॥



– शाहीर अमर शेख



**महात्मा फुले यांनी शिवरायांची समाधी शोधून काढली त्यांना कुळवाडीभूषण म्हणजे शेतकऱ्यांचा राजा म्हटले**

मावळे गडी सोबतीला। शिपाई केले उघड्याला।।
टळेना रयत सुखाला। बनवी नव्या कायद्याला।।
कुळवाडीभूषण पवाडा गातो भोसल्याचा।
छत्रपती शिवाजीचा।।

– म. फुले (शिवरायांचा पहिला पोवाडा)

**शिवरायांचे हे विचार महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांनी पुढे नेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हेच विचार संविधानात उतरवले.**



# छत्रपती शिवाजी महाराजांची मूल्ये भारतीय संविधानात

आणि म्हणून संविधानाच्या मूळ हस्तलिखितामध्ये पान क्र. १४१ वर छत्रपती शिवरायांचे चित्र आहे.

यातून संविधान राबविणाऱ्या

## लोकप्रतिनिधींनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घ्यावा

असेच अधोरेखित होते.

## भारतीय संविधानाला विरोध म्हणजे शिवरायांच्या विचारांना विरोध

**इतिहास हे हत्यार आहे,**
**त्याने समाज घडवता येतो आणि**
**बिघडवताही येतो.**

**शिवरायांचा इतिहास विकृत करून**
**जातीय–धार्मिक द्वेष पसरवणाऱ्या**
**शक्तींना रोखणे गरजेचे आहे.**

म्हणून छत्रपती शिवरायांचे खरे
कार्य समजून घेण्याची आणि ते
घरोघरी पोचवण्याची जबाबदारी
प्रत्येक शिवप्रेमी, संविधानप्रेमी
नागरिकाची आहे.

**ना जातीचे ना धर्माचे,**
**शिवाजी राजे रयतेचे!**




प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

**प्रतिपदेचा चंद्र जसा कलेकलेने वाढत जातो व अवघ्या विश्वात वंदनीय होतो, त्याप्रकारे शहाजींचा पुत्र शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा लौकिक वाढत जाईल व ही राजमुद्रा केवळ लोकांच्या कल्याणासाठी चमकेल.**

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**



वर्ग, जात, पंथ आणि वर्ण यांना दूर सारून समाजातील सर्व सर्वोत्कृष्ट माणसे शिवाजी महाराजांभोवती गोळा असत.

न्या. महादेव गोविंद रानडे



छ. शिवाजी महाराज मानवी सद्‌गुणांचे साक्षात प्रतीक होते.

पंडित नेहरू



सामान्य मंडळींमधून असामान्य कर्तृत्वाने महाराजांचे सहकारी उदयाला यावेत, ही घटना शाहिस्तेखानाची बोटे कापण्यापेक्षा जास्त रोमांचकारी आहे.

नरहर कुरुंदकर



आपल्या धर्माइतकाच इतरांचा धर्मही श्रेष्ठ व उच्च आहे हे महत्त्वाचे तत्व छ. शिवाजी महाराजांनी मांडले.

कॉ. गोविंद पानसरे

कॉ. गोविंद पानसरे यांच्या ‘शिवाजी कोण होता’ पुस्तकासाठी कोडला स्कॅन करा!

पुस्तकाची लिंक: **tiny.cc/shivaji-pdf**